।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र.कबचौउमवि / ०८ / शिष्यवृत्ती / महाडिबीटी / २०२२-२३ / 822 — दि.१३/१०/२०२२

(अत्यंत महत्वाचे शिष्यवृत्ती प्राधान्य)

प्रति,
मा.प्राचार्य / मा. संचालक, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये / परिसंस्था
मा.संचालक / विभाग प्रमुख, सर्व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

विषय :- शै.वर्ष सन २०२२-२३ मध्ये प्रवेशीत व शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी पोर्टलद्वारे विविध शिष्यवृत्ती योजनांची अंमलबजावणी करणेबाबत...

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, शै.वर्ष सन २०२२-२३ मध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ, जळगाव. संलग्नीत महाविद्यालये / परिसंस्था व विद्यापिठ शैक्षणिक प्रशाळा / विभाग अंतर्गत प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ ... वर्षात प्रवेशीत विद्यार्थ्यांसाठी मा. उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजना, तंत्र शिक्षण संचालनालय विभागांतर्गत योजना, आदिवासी विकास विभागांतर्गत योजना, सामाजिक न्याय विभागांतर्गत योजना व वि.जा.भ.ज, इतर मागास व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागांतर्गत योजना S.C. / S.T. / V.J.N.T. / S.B.C. / O.B.C. / S.E.B.C. / E.W.S. / General/Open या सर्व प्रवर्गातील महाराष्ट्र राज्याचे अधिवास असलेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी पोर्टल वरून (www.mahadbtmahait.gov.in) या संकेतस्थळावर विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी ऑनलाईन शिष्यवृत्तीचे नवीन (Fresh) व नुतनीकरण (Renewal) अर्ज भरण्याची सुविधा दि. २१/०९/२०२२ पासून देण्यात आलेली आहे.

वरील बाबतीत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्नीत सर्व महाविद्यालये / परिसंस्था व विद्यापीठ शैक्षणीक प्रशाळा / विभागांनी सन २०२२-२३ मध्ये प्रवेशीत सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन शिष्यवृत्ती नियम व अटी नुसार पात्र विद्यार्थ्यांना विहीत मुदतीत महाडीबीटी पोर्टल वर (www.mahadbtmahait.gov.in) या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याबाबत सुचना नोटीस बोर्डवर तथा बॅनर स्वरुपात लावून सुचना देण्यात याव्यात.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करतांना त्यात दर्शविण्यात आलेली सर्व कागदपत्रे मुळ कागदपत्रावरून Scan करूनच ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या जागी अपलोड करणे आवश्यक आहे.

महाडीबीटी पोर्टलवरील सर्व विविध योजनांसाठी जे पात्र विद्यार्थी विहीत केलेल्या मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणार नाहीत त्यांना सन २०२२-२३ साठी संबंधीत शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

म. कळावे

आपला विश्वासु
(डॉ. विनोद प्र. पाटील)
कुलसचिव,
कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

प्रत माहितीसाठी
१. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण जळगाव, विभाग जळगाव.
२. मा. कुलगुरू कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव.
३. मा. प्र. कुलगुरू कार्यालय, कबचौ उमवि जळगाव.
४. मा. कुलसचिव कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव.
५. मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौ उमवि, जळगाव.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

शिष्यवृत्ती विभाग

जा.क्र.कबचौउमवि/ 05/शिष्यवृत्ती / 256 /2021 दि.03/09/2021

अत्यंत महत्वाचे (शिष्यवृत्ती प्राधान्य)

प्रति,

1. मा.प्राचार्य,
   कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत
   सर्व महाविद्यालये.
2. मा.संचालक,
   कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत
   सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था.
3. मा.संचालक /मा.विभाग प्रमुख,
   सर्व शैक्षणिक प्रशाळा /विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ. जळगाव.

विषय :राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना अट क्र.30 च्या अनुषंगाने मुदतवाढ देण्याबाबत

संदर्भ : 1. शासन पत्र क्र. संकीर्ण -2017/प्र.क.332/ भाग-3/ताशि.4 दि.23 जुन 2021

2. मा.संचालनालयाचेपत्र क्र.उशिसं/शिष्य/राछशा/2021/9259 दि.23/08/2021

3. मा.सहसंचालक,उ.शि.जळगाव यांचे पत्र क्र.ससंउशि/राछशा/2020-21दि.24/08/2021

महोदय,

शासनाचे वरील संदर्भिय पत्र क्र. 1 ते 3 चे अवलोकन करावे. त्यानूसार **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती** योजनांतर्गत पात्र अभ्यासक्रम राबविणाऱ्या संबंधीत शैक्षणिक संस्थानां शैक्षणिक वर्ष 2021-22 अखेर पर्यंत (NAAC, NBA इं) मुल्यांकन / पुनर्मुल्यांकन व दर्जाचे मानांकन (Assessment and Accreditation) प्राप्त करुन घेणे आवश्यक व बंधनकारक असल्याचे नमुद करण्यात आले आहे. (सोबत संदर्भिय शासन पत्र क्र. 1 ते 3 जोडलेले आहे.)

त्या अनुषंगाने याद्वारे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2022-23 पासून संबंधित संस्थेतील अभ्यासक्रम या योजनेखालील शिष्यवृत्तीसाठी पात्र आहे किंवा अपात्र याची माहिती प्रथम / थेट द्वितीय वर्गाच्या प्रवेशाच्या वेळी संबंधीत विद्यार्थ्यास उपलब्ध होईल या दृष्टीने सर्व संलग्नीत महाविद्यालये व विद्यापीठ यांनी नियोजन करावे. तसेच केंद्रीयभुत प्रवेश प्रक्रियेत प्रवेश घेतांना विद्यार्थ्याने शिष्यवृत्तीसाठी अपात्र अभ्यासक्रमांची निवड केल्यास त्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही. सदर बाब आपल्या स्तरावर विद्यार्थ्याच्या निदर्शनास आणून देण्यात यावी, ही विनंती. तसेच पत्र क्र.1 ते 3 मध्ये नमूद केल्याप्रमाणे NAAC, NBA मुल्यांकन / पुनर्मुल्यांकन संदर्भात तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

आपला विश्वासू,

3/9/21

(प्र.डॉ.अ.बा.चौधरी)
प्र-कुलसचिव

सोबत:-वरीलप्रमाणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर:

1. मा.सहसंचालक, उच्च शिक्षण. प्रशासन, शिक्षण संचालनालय, म.रा.पुणे -1
2. मा.सहसंचालक, उच्च शिक्षण जळगाव विभाग, जळगाव.

प्रत :

1. मा.कुलगुरू कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
2. मा.प्र-कुलगुरू कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
3. मा.कुलसचिव कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव
4. मा.वित्त व लेखा अधिकारी, कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत, दुरध्वनी क्र : ०२५७ - २२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७ - २२५८४०३,४०६
Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257 - 2258428, 2258429
Fax No. 0257 - 2258403, 406 Email : registrar@nmu.ac.in Web : www.nmu.ac.in

महाराष्ट्र-शासन
सहसंचालक,उच्च शिक्षण,
जळगांव विभाग,जळगांव यांचे कार्यालय,जीवनधारा महाराष्ट्र जीवन प्राधीकरण
ईमारत,जळगांव जि.जळगांव

दुरध्वनी क्रं. व फॅक्स क्रं.(०२५७) २२३८५१०, E-mail:-jdhe_jal@yahoo.co.in

जा.क्र.स.सं.उ.शि./राछशा/ २०२०-२१/ दिनांक- २४/०८/२०२१

प्रति,

१. कुलसचिव,
क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव.

२. कुलसचिव,
एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई.

३. सर्व प्राचार्य, अशासकीय अनुदानित,व विना अनु.कायम विनाअनुदानित,
कला,वाणिज्य, विज्ञान आणि विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
जळगांव, धुळे , नंदुरबार.

विषयः- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना अट क. ३० च्या अनुषंगाने मुदतवाढ देण्याबाबत..

संदर्भ :- १.मा.संचालनालयाचे क्र.उशिसं/शिष्य./राछशा/२०२१/९२५९/दिनांक २४.०८.२०२१
२.शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क.संकीर्ण -२०१७/प्रक.३३२/ताशि-५ दि.०७ ऑक्टो.२०१७
३.शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क.संकीर्ण -२०१७/प्रक.३३२(भाग-३)/ताशि-४
दि.०७ ऑगष्ट २०१८
४.शासन पत्र कमांक :संकीर्ण -२०१७/प्र.क.३३२/भाग-३/ताशि-४, दि.०७ ऑगष्ट, २०१८ दि. २३ जून २०२१

उपरोक्त विषयाबाबत, शासन पत्र कमांक :संकीर्ण -२०१७/प्र.क.३३२/भाग-३/ताशि-४, दिनांक २३ जून २०२१ कृपया अवलोकन करावे. सोबत प्रत जोडली आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेकरीता निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क.संकीर्ण -२०१७/प्र.क.३३२/ताशि-४ दिनाक ०७ ऑक्टोबर २०१७ मधिल शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क.संकीर्ण -२०१८/प्रक.३३२(भाग-३)/ताशि-४ दिनांक ०७/०८/२०१८ अन्वये सुधारीत केल्यामुळे अट क्र. ३० पुढीलप्रमाणे आहे. सदर योजनेअंतर्गत पात्र अभ्यासक्रम राबविण्या-या संबंधित शैक्षणिक संस्था (NACC,NBA इ. ) मूल्यांकन/पुर्नमुल्यांकन करण्यास ठरल्यानंतर त्यांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या अखेरपर्यत सक्षम शिखर संस्था/ यंत्रणा मंडळाकडून असे मुल्यांकन व दर्जाचे (Assessment and Accreditation) करुन घेण्यासाठी शिखर संस्थांकडे/ मंडळाकडे अर्ज करणे क्रमप्राप्त राहील. तथापी या योजनेंतर्गत शिष्यवत्ती प्रधान करण्यासाठी या अटीची सक्ती शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पर्यंत करण्यात आलेली नाही.

याबाबत संदर्भिय अ.क्र.४ येथील दिनांक २३ जून २०२१ अन्वये, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ अखेरपर्यंत (NACC,NBA इ. ) मुल्यांकन / पुर्नमुल्यांकन व दर्जाचे मानांकन (Assessment and Accreditation) प्राप्त करुन घेणेसाठी पात्र ठरलेल्या संस्थांच्याबाबतीत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पर्यंत शिखर संस्थांकडे अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व त्यानंतर मुल्यांकन व दर्जाचे (Assessment and Accreditation) करुन घेण्यासाठी पात्र ठरलेल्या संस्थांना त्या पुढील शैक्षणिक वर्षाच्या अखेरपर्यत संबंधित शिखर संस्थांकडे मानांकन प्राप्त करुन घेण्यासाठी अर्ज करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

तरी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून संबंधित संस्थेतील अभ्यासक्रम या योजनेखालील शिष्यवृत्तीसाठी पात्र आहे किंवा अपात्र याची माहिती प्रथम/ थेट द्वितीय वर्गाच्या प्रवेशाच्या वेळी संबंधित विध्यार्थ्याला उपलब्ध होईल, या दृष्टीने सर्व विध्यापीठे व संबंधित महाविध्यालये, यांनी नियोजन करावे. तसेच विध्यार्थ्याने केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रियेत प्रवेश घेतांना शिष्यवृत्तीसाठी अपात्र असलेल्या अभ्यासक्रमाची निवड केल्यास त्या विध्यार्थ्यास लाभ मिळणार नसल्याचा आपल्या स्तरावरुन संबंधितांना कळविण्यात यावे.

सहसंचालक,
उच्च शिक्षण,
जळगांव विभाग, जळगांव

प्रत- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षणसंचालनालय, म.रा.पुणे-१

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

web: www.dhepune.gov.in E-mail: scholarshiphd2@gmail.com

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६११११५३

क्र.उशिसं- /शिष्य /राछशा /२०२१/ / 9259 दि.२८/०७/२०२१

23 AUG 2021

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

विषय:-राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना अट क्र. ३० च्या अनुषंगाने मुदतवाढ देण्याबाबत.

संदर्भ: १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि -५ दि.७ऑक्टोबर,२०१७

२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२ (भाग-३)/तांशि-४ दि.७ऑगस्ट,२०१८

३) शासन प्रत्र क्रमांक :संकिर्ण-२०१७/प्र.क.३३२/भाग-३/तांशि -४, दि. ७ ऑगस्ट,२०१८ दि.२३जून २०२१

उपरोक्त विषयाबाबत, शासन पत्र क्रमाक-संकीर्ण-२०१७/प्र.क्र ३३२/भाग-३/तांशि-४दिनांक २३जून २०२१ कृपया अवलोकन करावे. सोबत प्रत जोडली आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेकरिता निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क. ३३२/तांशि-४,दि ७.ऑक्टोबर,२०१७ मधील शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण -२०१८/प्र.क.३३२(भाग-३)/तांशि-४ दि.७/८/२०१८ अन्वये सुधारित केल्याप्रमाणे अट क. ३० पुढीलप्रमाणे आहे. "सदर योजनेंतर्गत पात्र अभ्यासक्रम राबविण्याऱ्या सबंधित शैक्षणिक संस्था (NACC,NBA इ. ) मूल्यांकन/पुर्नमूल्यांकन करण्यास पात्र ठरल्यानंतर त्यांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या अखेरपर्यत सक्षम शिखर संस्था/ यंत्रणा मंडळाकडून असे मूल्यांकन व दर्जाचे मानांकन प्राप्त (Assessment and Accreditation) करून घेण्यासाठी शिखर संस्थांकडे/मंडळाकडे अर्ज करणे कमप्राप्त राहिल. " तथापि या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती प्रदान करण्यासाठी या अटीची सक्ती शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पर्यत करण्यात आलेली नाही.

याबाबत संदर्भिय अ.क्र.३ येथील दिनांक २३जून २०२१ अन्वये, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ अखेरपर्यत (NACC,NBA इ. ) मूल्यांकन / पुर्नमूल्यांकन व दर्जाचे मानांकन (Assessment and Accreditation ) प्राप्त करून घेणेसाठी पात्र ठरलेल्या संस्थांच्याबाबतीत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पर्यत शिखर संस्थाकडे अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व त्यानंतर मूल्यांकन व दर्जाचे (Assessment and Accreditation ) प्राप्त करुन घेण्यासाठी पात्र ठरलेल्या संस्थांना त्या पुढील शैक्षणिक वर्षाच्या अखेरपर्यत संबधित शिखर संस्थांकडे मानांकन प्राप्त करून घेण्यासाठी अर्ज करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

तरी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून संबंधित संस्थेतील अभ्यासक्रम या योजनेखालील शिष्यवृत्तीसाठी पात्र आहे किंवा अपात्र याची माहिती प्रथम/ थेट द्वितीय वर्गाच्या प्रवेशाच्या वेळी संबंधित विद्यार्थ्याला उपलब्ध होईल, या दृष्टीने सर्व विभागीय सहसंचालक व संबंधित महाविद्यालये यांनी नियोजन करावे. तसेच विद्याथ्याने केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रियेत प्रवेश घेताना शिष्यवृत्तीसाठी अपात्र असलेल्या अभ्यासक्रमाची निवड केल्यास त्या विद्यार्थ्यास लाभ मिळणार नसल्याचा आपल्या स्तरावरून संबंधिताना कळविण्यात यावे.

(डॉ.प्रकाश बच्छांव )
सहसंचालक,उच्च शिक्षण.प्रशासन.
शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
पुणे.

सह संचालक (उ.शि.)
जळगांव विभाग जळगांव
आवक नंबर 4237
दिनांक 24-8-2021
विभाग

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र ०२२-२२०४०९३५.
Email ID : sanjay.dharurkar@nic.in

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११००१

क्रमांक: संकिर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/भाग-३/तांशि-४ दिनांक : २३जून,२०२१

प्रति,

१) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय : राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना अट क्र.३० च्या अनुषंगाने मुदतवाढ देण्याबाबत...

संदर्भ: १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-५, दि.७ ऑक्टोबर,२०१७
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२ (भाग-३)/तांशि-४, दि.७ ऑगस्ट,२०१८
३) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे क्र.१८/तंशिसं/ईबीसी/एनबीए/शा.प./२०२०/३९७, दि.१७ डिसेंबर,२०२० चे पत्र.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेकरीता निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.७ ऑक्टोबर, २०१७ मधील शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३३२ (भाग-३)/तांशि-४, दि.७/८/२०१८ अन्वये सुधारित केल्याप्रमाणे अट क्र.३० पुढीलप्रमाणे आहे:-

२. सदर योजनेंतर्गत पात्र अभ्यासक्रम राबविण्याऱ्या सबंधित शैक्षणिक संस्था (NAAC,NBA इ.) मूल्यांकन/पुर्नमूल्यांकन करण्यास पात्र ठरल्यानंतर त्यांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या अखेरपर्यंत सक्षम शिखर संस्था/यंत्रणा मंडळाकडून असे मूल्यांकन व दर्जाचे मानांकन प्राप्त (Assessment and Accreditation)करुन घेण्यासाठी शिखर संस्थांकडे/मंडळांकडे अर्ज करणे क्रमप्राप्त राहिल."

३. तथापि, या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती प्रदान करण्यासाठी या अटीची सक्ती शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पर्यंत करण्यात आलेली नाही. त्यामुळे आता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ अखेरपर्यंत (NAAC, NBA इ.) मूल्यांकन /पुर्नमुल्यांकन व दर्जाचे मानांकन (Assessment and Accreditation) प्राप्त करुन घेणेसाठी पात्र ठरलेल्या संस्थांच्याबाबतीत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पर्यंत शिखर संस्थांकडे अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.



Scanned with CamScanner

४. त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व त्यानंतर मूल्यांकन व दर्जाचे मानांकन (Assessment and Accreditation) प्राप्त करुन घेण्यासाठी पात्र ठरलेल्या संस्थांना त्या पुढील शैक्षणिक वर्षाच्या अखेरपर्यंत संबंधित शिखर संस्थांकडे मानांकन प्राप्त करुन घेण्यासाठी अर्ज करणे बंधनकारक राहिल.

५. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून संबंधित संस्थेतील अभ्यासक्रम या योजनेखालील शिष्यवृत्तीसाठी पात्र आहे किंवा अपात्र आहे याची माहिती प्रथम / थेट व्दितीय वर्गाच्या प्रवेशाच्या वेळी संबंधित विद्यार्थ्यांला उपलब्ध होईल, या दृष्टीने सर्व संबंधितांनी नियोजन करावे. विद्यार्थ्याने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत प्रवेश घेताना शिष्यवृत्तीसाठी अपात्र असलेतर अभ्यासक्रमाची निवड केल्यास त्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नसल्याचा स्पष्ट संदेश देण्यात यावा.

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

अमुस / प्र.स./ सचिव,

१. कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,९ वा मजला, प्रशासकीय इमारत, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
४. आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. इतर मागास व बहुजन कल्याण विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. निवड नस्ती



Scanned with CamScanner

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

शिष्यवृत्ती विभाग

जा.क्र.कबचौउमवि/०५/शिष्यवृत्ती / २५७ /२०२१ दि.०३/०९/२०२१

अत्यंत महत्वाचे (शिष्यवृत्ती प्राधान्य)
(कालमर्यादित दि.३०/११/२०२१)

**प्रति,**

१. **मा.प्राचार्य / मा.संचालक,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत**
**सर्व महाविद्यालयये /मान्यताप्राप्त परिसंस्था.**

२. **मा.संचालक /मा.विभाग प्रमुख,**
**सर्व शैक्षणिक प्रशाळा /विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ. जळगाव.**

**विषय :** अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२ साठी अमंलबजावणीबाबत.

**संदर्भ :** १.मा. शिक्षण संचालनालयाची PMS शिष्यवृत्ती प्रसिध्द जाहिरात
२. मा. शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/पीएमस/२०२१-२२/९७३३ दि.३०/०८/२०२१.
3. NSP Timelines for AY 2021-22

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयाचे संदर्भिय परिपत्रकाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सन २०२१-२२ मध्ये आपल्या महाविद्यालयातील / परिसंस्थेतील / विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागातील सर्व प्रवेशीत मुस्लिम, खिश्चन, शिख, बौध्द, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील पात्र विद्यार्थ्यांना **"केंद्रशासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२"** या शिष्यवृत्तीचा लाभ घेता यावा यासाठी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरील **(www.scholarships.gov.in)** या संकेत स्थळावर नवीन मंजूरीचे आणि नुतनीकरणाचे **(Renewal)** शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन **(Online)** पध्दतीने मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन **(Offline)** पध्दतीने भरलेले शिष्यवृत्ती अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नसल्याने जे विद्यार्थी विहीत मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणार नाहीत त्यांना केंद्रशासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेता येणार नाही.

वरील प्रमाणे संदर्भिय जाहिरात सोबत जोडलेली असून सदर जाहिरात आपल्या महाविद्यालयातील/परिसंस्थेतील / विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा/ विभागातील सन २०२१-२२ मध्ये प्रवेशीत सर्व मुस्लिम, खिश्चन, शिख, बौध्द, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील पात्र विद्यार्थ्यांना निदर्शनास आणून देवून शिष्यवृत्तीसाठी विहीत मुदत दि.३०/११/२०२१अशी निर्धारीत करण्यात आलेली असल्याने ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याबाबत व आवश्यकते सर्व कागदपत्र Scan करुन upload करणेबाबत सुचना देण्यात याव्यात.

तसेच सदर शिष्यवृत्तीसाठी आपल्या महाविद्यालयातील / परिसंस्थेतील / विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागातील सन २०२१-२२ मध्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती व शिष्यवृत्तीचे नुतनीकरण (Renewal) अर्ज सोबत जोडलेल्या संचालनालयाच्या संदर्भिय परिपत्रकानुसार अटी व शर्ती प्रमाणे विहीत मुदतीच्या आत दि. ३०/११/२०२१ पर्यंत ऑनलाईन भरून घेवून विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह महाविद्यालयाकडे प्राप्त करुन घेवून त्वरीत विहित मुदतीच्या आत ऑनलाईन फॉरवर्ड करण्यात यावेत. तसेच विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागातील विद्यार्थ्यांचे अर्ज वित्त विभागातील शिष्यवृत्ती कक्षात तपासणी साठी विभागप्रमुखांच्या शिफारशीसह तात्काळ पाठवावे. ही विनंती.

**सोबत:- उपरोक्त संदर्भिय पत्र क्र.१ ते ३.**

आपला विश्वासु,
3/9/21
(प्रा.डॉ.प.वा.चौधरी)
प्र. कुलसचिव

**प्रत माहितीसाठी**

१. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय मध्यवर्ती इमारत, म.रा.पुणे -१,
२. मा.सहसंचालक, उ.शि. जळगाव विभाग जळगाव
३. मा.कुलगुरू कार्यालय, .कबचौउमवि , जळगाव
४. मा.प्र-कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि , जळगाव
५. मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि , जळगाव
६. मा. वित्त व लेखा अधिकारी, कार्यालय कबचौउमवि , जळगाव

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत, दुरध्वनी क्र : ०२५७ - २२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७ - २२५८४०३,४०६
Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257 - 2258428, 2258429
Fax No. 0257 - 2258403, 406 Email : registrar@nmu.ac.in Web : www.nmu.ac.in

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११ ००१.**

**Web : www.dhepune.gov.in** **E-mail : schol.dhepune@gov.in**

फोन नं. ०२०/२६१२६९३९ फॅक्स नं. ०२०/२६११११५३

क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/पीएमएस/२०२१-२२ 9733 दिनांक : २५-८-२०२१

30 AUG 2021

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय : अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२ च्या अंमलबजावणीबाबत.**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिक्षणाकरीता केंद्र शासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२ साठी राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नुतनीकरण(Renewal) करण्यासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामध्ये महाराष्ट्र राज्यासाठी नवीन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी **४७५७५** संच निर्धारित केलेले आहेत. **केंद्रशासनामार्फत नवीन शिष्यवृत्तीसाठी व नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३० नोव्हेंबर २०२१ अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.** पोस्ट मॅट्रिक अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीची सविस्तर माहिती, अर्ज करण्याची पध्दत, संकेतस्थळ, तसेच इतर अनुषंगिक माहितीबाबत संचालनालयाच्या वतीने राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांमधून जाहिरात देऊन त्यास प्रसिध्दी देण्यात येत आहे. तसेच सदर जाहिरात या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर संकेतस्थळावर केंद्रशासनाकडून प्राप्त झालेल्या Standard Operating Procedure (SOP), Guidelines, Frequently Asked Questions (FAQs) for Post Matric Scholarship for minorities तसेच वेळोवेळी प्राप्त झालेली इतर माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

मार्गदर्शक सूचना (Guidelines) व FAQs काळजीपूर्वक वाचून त्यानुसार सर्व महाविद्यालयांना / विद्यापीठांना कार्यवाही करण्याबाबत सूचित करावे. तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नविन / सुधारीत प्राप्त सूचनांसाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळाचे व या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन महाविद्यालयांनी व विद्यार्थ्यांनी करण्याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात.

सदर (Guidelines) मार्गदर्शक सूचनांनूसार महाविद्यालये/ विद्यापीठाच्या प्रमुखांनी त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जात नमूद केलेला त्यांचा आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी लिंक केलेला असल्याची खात्री करावी. आधार क्रमांक बँक खात्याशी लिंक केलेला नसेल तर तशा सूचना संबंधित विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज भरतांना त्यांचा आधार क्रमांक त्यांच्या ज्या बँक खात्याशी लिंक केलेला आहे, त्याच खात्याचा क्रमांक अर्जात नमूद करावा अशा सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हींग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्याच्या ओळखीबाबतचे फोटोसह असलेले प्रमाणपत्र ईत्यादी यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत सर्व कागदपत्रांसह जोडण्याबाबत सूचना द्याव्यात.

महाविद्यालालये / विद्यापीठांनी रु. ५०,०००/- पेक्षा कमी शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जासोबतची कागदपत्रे काटेकोरपणे तपासून ऑनलाईन अर्जावर पुढील कार्यवाही करावी. सदर कागदपत्र महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर

Scanned with CamScanner

जतन करुन ठेवावी व रु ५०,०००/- पेक्षा जास्त शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या अर्जासोबतची कागदपत्रे ऑनलाईन अर्जासोबत Upload करणे आवश्यक आहे.

ज्या विद्यार्थ्यांना मागील वर्षात नविन मंजूरीसाठी शिष्यवृत्ती मंजूर झालेली / मिळालेली आहे त्या विद्यार्थ्यांनी त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत नूतनीकरणाचाच अर्ज भरण्याच्या सूचना महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना देण्याबाबत कळविण्यात यावे.

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन अर्जांची कागदपत्रासंह तपासणी करुन मंजूर केलेले पात्र अर्ज पुढील टप्प्यावर विनाविलंब ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अर्ज फॉरवर्ड करण्यासाठी अंतिम दिनांकाची वाट पाहू नये अशा सूचना महाविद्यालयांना देण्यात याव्यात.

NSP पोर्टल द्वारे सर्व महाविद्यालयांना Aadhar base लॉगीन करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे तसेच सन २०२१-२२ पूर्वी ज्या महाविद्यालयांनी KYC पूर्ण केले आहेत त्यांनी त्यांच्या NSP Portal वर Institute लॉगीन मध्ये आधार व मोबाईल नंबर नोंदणी( Register) करणे आवश्यक आहे. तसेच सन २०२१-२२ साठी नवीन महाविद्यालय /संस्था यांची KYC करण्याबाबतची प्रक्रीया NSP Portal च्या HOME Page वरील Services Option वर Institute KYC Registration Form मध्ये देण्यात आलेली आहे. (KYC करण्याबाबतची प्रक्रीया याची सविस्तर माहिती www.dhepune@gov.in या संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे.) सदर Form भरल्यानंतर State Nodal Officer द्वारे सदरच्या भरलेल्या तपशीलाची पडताळणी करून त्यांना ऑनलाईन पध्दतीने युजर आयडी व पासवर्ड मिळेल.

NSP Portal द्वारे ज्या शिष्यवृत्ती लाभार्थीचे आधार कार्ड, मोबाईल नंबर प्रमाणित केलेले आहेत व त्यांचे वय १८ वर्षांच्या वर आहे अशा सर्व ( Fresh & Renewal) लाभार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मिळेल.

केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यासाठी निर्धारित केलेले नवीन शिष्यवृत्तीचे संच पूर्ण करण्याची जबाबदारी सर्व विभागीय कार्यालयांवर आहे. यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी. यासोबत पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीची सन २०२१-२२ ची जाहिरात जोडण्यात येत आहे. सदर जाहिरात महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयाच्या दर्शनी भागात लावण्याबाबत आदेश देण्यात यावेत. सदर सूचना आपल्या विभागांतर्गत सर्व महाविद्यालये व विद्यापीठांना देण्यात याव्यात.

तसेच इयत्ता ११ वी, १२ वी च्या विद्यार्थ्यांनी अर्ज करावेत यासाठी आपण आपल्या विभागातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागास त्यांनी त्यांच्या विभागांतर्गत सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना याबात सूचना देण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच व्यावसायिक डिप्लोमा, आय टी आय इत्यादी अभ्यासक्रमाच्या पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज भरावेत यासाठी संबंधित विभागांना कळविण्यात यावे.

अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती सन २०२१-२२ ही राज्यात यशस्वीपणे राबविण्यासाठी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालय / शैक्षणिक संस्था यांचे प्राचार्य / विभागप्रमुख यांच्या कार्यशाळा, बैटका घेण्यात याव्यात व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ होईल, यासाठी प्रयत्न करावे.

तसेच सदर शिष्यवृत्तीबाबतच्या महाविद्यालय व विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करावे. विभागामार्फत घेण्यात आलेल्या कार्यशाळा / बैठका यांचा अहवाल या संचालनालयास सादर करण्यात यावा.

तसेच जास्तीत जास्त पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरावेत यासाठी याबाबतची निःशुल्क बातमी आपल्या विभागातील सर्व जिल्हयांमधील विविध वर्तमानपत्रात जिल्हा माहिती कार्यालयांमार्फत त्वरीत देण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे -१.

Scanned with CamScanner

प्रत- **माहिती व कार्यवाहीस्तव,**

**आपल्या अधिनस्त असलेल्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना याबाबत कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना देण्याच्या आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

१. मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,०३ महापालिका मार्ग ,मुंबई
२. मा.संचालक,वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार,मुंबई
३. मा.संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, ०३ महापालिका मार्ग ,मुंबई.
४. मा.संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,भांबुर्डा,पुणे.
५. मा.संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-०१
६. कुलसचिव,महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,म्हसरुळ,वणी ,दिंडोरी रोड नाशिक-४२२ ००४.
७. कुलसचिव,महाराष्ट्र पशुविज्ञान विद्यापीठ,फुटाला लेक,नागपूर ४४० ००१
८ .मा.संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-०१-.
- यांनी त्यांच्या अधिनस्त असणा-या कनिष्ठ महाविद्यालयांना (इयत्ता ११ वी व १२ वी ) सूचना देण्यात याव्यात.

९. कुलसचिव,सर्व कृषि /अकृषि /अभिमत विद्यापीठे,महाराष्ट्र राज्य.

Scanned with CamScanner

**No. D-12011/09/2021-DBT**
**Government of India/ भारत सरकार**
**Cabinet Secretariat/ मंत्रिमंडल सचिवालय**
**DBT Mission/ प्रत्यक्ष लाभ अंतरण मिशन**

4th Floor, Shivaji Stadium Annexe
Rajiv Chowk, New Delhi- 110001
Dated: August 17, 2021

**OFFICE MEMORANDUM**

**Subject: NSP Timelines for AY 2021-22.**

The undersigned is directed to refer to the meeting held under the Chairmanship of Joint Secretary (DBT), Cabinet Secretariat on 11th August, 2021 on the above-mentioned subject wherein it was decided to recommend timelines on NSP for AY 2021-22 for approval of the Competent Authority (Para 6 of the Minutes of the Meeting refers). The Competent Authority has approved the following timelines on NSP for AY 2021-22: -

| | |
|---|---|
| Opening of Portal for accepting applications | 18th August, 2021 |
| Closing of Portal for accepting Pre-Matric applications | 15th November, 2021 |
| Closing of Portal for accepting Post-Matric applications | 30th November, 2021 |
| Closing of First level verification | 15th December, 2021 |
| Closing of Second level verification | 31st December, 2021 |

(Ravi Ranjan)
Under Secretary (DBT)
Tele. 23343860 Extn: 363

To,

1. Secretary, D/o Higher Education
2. Secretary, D/o Social Justice & Empowerment
3. Secretary, M/o Minority Affairs
4. Secretary, M/o Tribal Affairs
5. Secretary, D/o Empowerment of Persons with Disabilities
6. Secretary, D/o School Education & Literacy
7. Secretary, M/o Labour & Employment
8. Chairperson, Welfare & Rehabilitation Board, MHA
9. Director General, Railways Protection Force
10. Secretary, UGC
11. Chairman, AICTE
12. Secretary, M/o Electronics & IT
13. CEO, UIDAI
14. Controller General of Accounts.
15. Director General, NIC
16. Secretary, UGC
17. Chairman, AICTE

Copy for information to: -

3. PSO to Secretary (Coord), Cabinet Secretariat

महाराष्ट्र शासन

उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१.

जाहिरात

# केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर ( Post Matric ) शिष्यवृत्ती योजना सन २०२१ - २२

राज्यातील मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील गुणवान विद्यार्थ्यांसाठी केंद्रशासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये सन २०२१-२२ साठी ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. यासाठी विद्यार्थ्यांचे नविन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Renewal) करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांनी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे. फक्त ऑनलाईन (Online) पध्दतीने भरलेले अर्ज स्विकारले जातील. **कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन (Offline) अर्ज स्विकारले जाणार नाहीत.** शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी केंद्र शासनाने नवीन शिष्यवृत्ती (Fresh) करिता **४७५७५** संच (Quota) निर्धारित केलेले असून त्यातील ३० टक्के संच मुलींसाठी राखीव आहेत. नूतनीकरणासाठी संच निर्धारीत नसतात. सदर शिष्यवृत्तीचा निधी १०० टक्के केंद्र शासनाकडून वितरीत करण्यात येतो. विद्यार्थ्यांस मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम (Course / Tution fee and maintenance allowance) केंद्र शासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT mode) जमा करण्यात येईल.

## ❖ शिष्यवृत्तीसाठी पात्र अभ्यासक्रम :

११ वी ते पीएच्.डी ,व्यावसायिक, (डी.एड्., बी.एड्., एम.एड्., आय.टी.आय.) सर्व डिप्लोमा व अकरावी / बारावी स्तरांवरील एम.सी.व्ही.सी. अभ्यासक्रम (तंत्र शिक्षण विभागातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यादीतील अभ्यासक्रम सोडून इतर सर्व).

## ❖ किमान पात्रता व अटी :

१.) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

२.) विद्यार्थी मागील वार्षिक परीक्षेत किमान ५० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.

३.) अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २.०० लाख पर्यंत असावे.

४.) अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.

५.) नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यास मागील वार्षिक परीक्षेत ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे तसेच विद्यार्थी त्याच महाविद्यालयात व त्याच अभ्यासक्रमात शिकत असणे आवश्यक आहे.

Scanned with CamScanner

७.) एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटांच उल्लघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल / वसूल केली जाईल.

८.) विद्यार्थ्याने घेतलेला अभ्यासक्रम कमीत कमी १ वर्ष कालावधीचा असणे आवश्यक आहे.

❖ **अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे :**

१) विद्यार्थ्याचा फोटो

२) मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत.(Self Attested)

३) महाविद्यालयाने संबंधित विद्यार्थी त्या महाविद्यालयात असल्याबाबतचे तसेच Day scholars / hosteller याबाबतची पडताळणी केल्याबाबतचे प्रपत्र (Institution Verification Form FAQs) सोबत देण्यात आलेला आहे.

४) पालकाचे राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.

५) अल्पसंख्यांक समुदायाबाबतचे स्वतः प्रमाणित केलेले स्वयंघोषित प्रमाणपत्र,१८ वर्षाखालील विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या पालकांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र.

६) महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती / रिसीप्ट.

७) बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत.

८) रहिवासी प्रमाणपत्र. (Residential/Domicile Certificate)

९) आधार कार्ड छायांकित प्रत. तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्यांचे आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हींग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्याच्या ओळखीबाबतचे फोटोसह असलेले प्रमाणपत्र ईत्यादी यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या ऑनलाईन भरलेल्या अर्जाच्या हार्ड कॉपी सोबत सदर कागदपत्रे महाविद्यालयात अर्ज तपासणीसाठी त्वरीत सादर करावी. महाविद्यालयांनी सदर कागदपत्रे काटेकोरपणे तपासुन ऑनलाईन अर्जावर पुढील कार्यवाही करावी व सदर कागदपत्र त्यांच्या स्तरावर जतन करुन ठेवावी.

रु. ५०,०००/- पेक्षा जास्त शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या विद्यार्थ्यांनी अर्जासोबत सर्व कागदपत्र UPLOAD करणे आवश्यक आहे, तसेच महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती / रिसीप्ट प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह UPLOAD करण्यात यावी.

❖ **अर्ज करण्याची पध्दत (नविन मंजुरी /नुतनीकरण):**

१. अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. National Scholarhips (NSP) या मोबाईल ॲप ची सुविधा देखील अर्ज भरण्यासाठी देण्यात आलेली आहे.

३. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या homepage वरील Guiedlines व Frequently Asked Questions (FAQ) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

४. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधुन सदर अर्ज महाविद्यालयाच्या / संस्थेच्या मदतीने पूर्ण करून घ्यावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येणे अनिवार्य आहे.

५. विद्यार्थ्याने ज्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे त्या अभ्यासक्रमाच्या प्रथमवर्षी शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर अभ्यासक्रम पूर्ण होई पर्यंत विद्यार्थ्यांने **नूतनीकरणासाठीच** अर्ज भरावा.

Scanned with CamScanner

❖ **महाविद्यालय / संस्थांसाठी सूचना :**

१. विद्यार्थ्यांने महाविद्यालयात चालू वर्षात प्रवेश घेतलेला असणे आवश्यक आहे.
२. विद्यार्थ्यांने वसतीगृहात रहात असल्याचे अर्जात नमूद केलेले असल्यास त्याबाबतची खात्री संबंधित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या कायमस्वरूपी पत्त्यावरून करावी.
३. महाविद्यालयांनी संकेतस्थळाच्या Homepage वरील Guidelines व Frequently Asked Question (FAQs) बाबत व्यवस्थित माहिती करुन घेऊन त्यानुसार विद्यार्थ्यांना सूचना देण्यात याव्यात.
४. विद्यार्थ्यांस प्रथम वर्षी शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर तो अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांने नुतनिकरणाचा अर्ज भरल्याची खात्री करण्यात यावी.
५. सर्व महाविद्यालय/संस्था यांनी त्यांचे लॉगीनमधून ऑनलाईन पध्दतीने अद्ययावत अभ्यासक्रमनिहाय फी नमुद करुन Profile update करावे.
६. महाविद्यालय/संस्थानी प्रत्येक विद्यार्थ्याचा ऑनलाईन अर्ज तपासणी करतांना विद्यार्थ्यांचे Fee Details तपासून बरोबर नसल्यास त्यात दुरुस्ती (Edit) करावे.
७. NSP पोर्टल द्वारे सर्व महाविद्यालयांना Aadhar base लॉगीन करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे तसेच सन २०२१-२२ पूर्वी ज्या महाविद्यालयांनी KYC पूर्ण केले आहेत त्यांनी त्यांच्या NSP Portal वर Institute लॉगीन मध्ये आधार व मोबाईल नंबर नोंदणी( Register) करणे आवश्यक आहे. तसेच सन २०२१-२२ साठी नवीन महाविद्यालय /संस्था यांची KYC करण्याबाबतची प्रक्रीया NSP Portal च्या HOME Page वरील Services Option वर Institute KYC Registration Form मध्ये देण्यात आलेली आहे. (KYC करण्याबाबतची प्रक्रीया याची सविस्तर माहिती www.dhepune@gov.in या संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे.) सदर Form भरल्यानंतर State Nodal Officer द्वारे सदरच्या भरलेल्या तपशीलाची पडताळणी करून त्यांना ऑनलाईन पध्दतीने युजर आयडी व पासवर्ड मिळेल.

❖ **विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरतांना बँक तपशील भरण्याबाबत सूचना :**

१. विद्यार्थ्यांने (Drop Down List) मधून त्यांच्या बॅक / शाखेचे नाव काळजीपूर्वक निवडावे.
२. त्यानंतर विद्यार्थ्याने त्यांचा बँक खाते क्रमांक व आय.एफ.एस.सी. कोड अचूक भरावा. विद्यार्थ्यांनी त्यांच्या बँक खाते क्रमांक व आय.एफ.एस.सी. कोड बाबत त्यांच्या बॅकेकडून खात्री करून घ्यावी.
३. विद्यार्थ्यांचा बँक खाते क्रमांक चालू स्थितीत असणे (Operative / Active Mode) आवश्यक आहे. जेणेकरून शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण अयशस्वी (Fail) होणार नाही.
४. विद्यार्थ्यांचा खाते क्रमांक (Core bank facility) असलेल्या (Scheduled) बँकेचाच असणे आवश्यक आहे.
५. बँक खाते विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या नावावर असणे आवश्यक आहे.

Scanned with CamScanner

६. केंद्रशासनाच्या सूचनांनुसार ज्या विद्यार्थ्यांचे बँक तपशिल चुकीचे असतील अथवा त्यांच्या बँकेने त्यांचे बँक खाते प्रमाणित केले नाही (Incorrect / Not validate) तर त्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मंजूर झालेली असेल तरी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम जमा होणार नाही /रद्द होईल.

७. NSP Portal द्वारे ज्या शिष्यवृत्ती लाभार्थीचे आधार कार्ड, मोबाईल नंबर प्रमाणित केलेले आहेत व त्यांचे वय १८ वर्षांच्या वर आहे अशा सर्व ( Fresh & Renewal) लाभार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मिळेल.

**अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती सन २०२१-२२ करिता नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नूतनीकरण (Renewal) अर्ज सादर करण्यासाठी भारत सरकारने घोषित केलेले वेळापत्रक**

| अ.क्र. | कार्यसूची | अंतिम दिनांक<br>नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नूतनीकरण शिष्यवृत्ती (Renewal) |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | ३० नोव्हेंबर, २०२१ |
| २ | महाविद्यालयाने अर्जांची ऑनलाईन पडताळणी करण्याचा अंतिम दिनांक | १५ डिसेंबर २०२१ |

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज फॉरवर्ड करण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जासोबत दिलेल्या कागदपत्रांची तपासणी करून त्या अर्जांवर विनाविलंब योग्य ती कार्यवाही करून पात्र अर्ज पुढील टप्प्यावर तात्काळ फॉरवर्ड करावेत.

विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी अधिक माहितीसाठी तसेच याबाबतच्या वेळोवेळी नविन प्राप्त होणाऱ्या सूचनांसाठी www.scholarships.gov.in व www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे अवलोकन करावे. सदरचे संकेतस्थळ हे www.minorityaffairs.gov.in व www.dhepune.gov.in या संकेतस्थळांशी देखील जोडलेले (Link) आहे. तरीच संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाशी किंवा उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ येथे दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२६९३९ / २९७०७०९८ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.

(डॉ. धनराज माने)
संचालक तथा नोडल ऑफिसर
उच्च शिक्षण , महाराष्ट्र राज्य, पुणे १

Scanned with CamScanner

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

उमविनगर, जळगाव – ४२५००१ (महाराष्ट्र) भारत

**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**डॉ. विनोद प्र. पाटील**

कुलसचिव

जा.क्र.कबचौउमवि/०८/ शिष्य.दिव्यांगजन/२०२२-२३/५७६ दि.२०/०९/२०२२

अत्यंत महत्वाचे (शिष्यवृत्ती प्राधान्य)
(कालमर्यादित दि. ३०/१०/२०२२)

प्रति,
१. मा. प्राचार्य / मा. संचालक,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था.
२. मा. संचालक / विभाग प्रमुख,
सर्व शैक्षणीक प्रशाळा / विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

**विषय :- केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२२-२३ च्या अंमलबजावणी बाबत.**

संदर्भ:- १) मा. शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं-/शिष्य/दिव्यांगजन/२०२२-२३/१००४६ दि. २७/०७/२०२२
२) मा. सहसंचालक कार्यालयाचे पत्र क्र. स.सं.उ.शि./केंद्र शा पो. मॅट्रिक शि/२०२२-२३/३०९६ दि. २८/०७/२०२२

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सन २०२२-२३ मध्ये आपल्या महाविद्यालयातील / परिसंस्थेतील /, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागातील सर्व प्रवेशित केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे मार्फत दिव्यांगजन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे या उद्येशाने **"दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती सोजना सन २०२२-२३"** या शिष्यवृत्तीचा लाभ घेता यावा यासाठी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरील **www.scholarships.gov.in** या संकेत स्थळावर **नवीन मंजूरीचे (Fresh) आणि नुतनीकरणाचे (Renewal)** शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पध्दतीने भरलेले शिष्यवृत्ती अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नसल्याने जे विद्यार्थी विहीत मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणार नाहीत त्यांना दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेता योणार नाही असे कळविण्यात आले आहे.

वरील संदर्भिय परिपत्रक आपल्या महाविद्यालयातील / परिसंस्थेतील /, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागातील सन २०२२-२३ मध्ये प्रवेशीत सर्व दिव्यांगजन पात्र विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देवून, शिष्यवृत्तीसाठी विहीत मुदत दि. ३०/१०/२०२२ अशी निर्धारीत करण्यात आलेली असल्याने ऑनलाईन पध्दतीने शिष्यवृत्ती अर्ज भरण्याबाबत व आवश्यक ते सर्व कागदपत्र Scan करून upload करणेबाबत सुचना देण्यात याव्यात. तसेच सोबत जोडलेल्या **संचालनालयाच्या संदर्भिय परिपत्रकातील अटी व शर्ती प्रमाणे विहीत मुदतीच्या आत दि. ३०/१०/२०२२ पर्यंत ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज** भरून घेवून विद्यार्थ्यांचे ऑनलाईन भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रकासह महाविद्यालयाकडे प्राप्त करून घेवून त्वरीत विहित मुदतीच्या आत ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज फॉरवर्ड करण्यात यावेत, ही विनंती.

**टिप :- विद्यापिठ शैक्षणिक प्रशाळा / विभागातील प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज वित्त विभागातील शिष्यवृत्ती कक्षात तपासणी साठी विभागप्रमुखांच्या शिफारशींसह तात्काळ विहीत मुदतीच्या आत दि. ३०/१०/२०२२ पर्यंत पाठवावे, ही विनंती.**

**सोबत:- संदर्भिय परिपत्रक**

K.B.C. NORTH MAHARASHTRA UNIVERSITY JALGAON-425001

आपला विश्वासू,

(डॉ. विनोद प्र. पाटील)
कुलसचिव

प्रत माहितीसाठी
१. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालस मध्यवर्ती इमारत म.रा. पुणे.
२. मा. सहसंचालक, उ. शि. जळगाव, विभाग जळगाव.
३. मा. कुलगुरू कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव.
४. मा. प्र. कुलगुरू कार्यालय, कबचौ उमवि जळगाव.
५. मा. कुलसचिव कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव.
६. मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौ उमवि, जळगाव.

☎ कार्यालय : +९१- २५७ – २२५८४०५, २२५७२११ फॅक्स् : +९१- २५७ – २२५८४०६
ई मेलः registrar@nmu.ac.in वेबसाईट : www.nmu.ac.in

महाराष्ट्र शासन

सहसंचालक,उच्च शिक्षण,

जळगांव विभाग,जळगांव यांचे कार्यालय,जीवनधारा महाराष्ट्र जीवन प्राधीकरण

ईमारत,जळगांव जि.जळगांव

दुरध्वनी क्रं. व फॅक्स क्रं.(०२५७) २२३८५१०, E-mail:-jdhe_jal@yahoo.co.in

जा.क्र.स.सं.उ.शि./केंद्र शा पो. मॅट्रिक शि/२०२२-२३/ ३०९६ दिनांक- २८/०७/२०२२

प्रति,

१. कुलसचिव,
क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव.

२. कुलसचिव,
एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई.

३. सर्व प्राचार्य, अशासकीय अनुदानित,व विना अनु.कायम विनाअनुदानित,
कला,वाणिज्य, विज्ञान आणि विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
जळगांव, धुळे , नंदुरबार.

**विषयः- केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे मार्फत राबविण्यात येणा-या दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोष्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२२-२३ च्या अंमलबजावणी बाबत..**

संदर्भ :- १.मा.संचालनालयाचे क्र.उशिसं/शिष्य/दिव्यांगजन/ २०२२-२३/१००४६/ दिनांक २७.०७.२०२२

उपरोक्त संदर्भिय विषयाबाबत कळविण्यात येते की, केंद्रशासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मार्फत दिव्यांगजन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे या उद्देशाने दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोष्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. **सन २०२२-२३** मध्ये सदर शिष्यवृत्ती योजनेकरीता नविन मंजूरीचे (Fresh) आणि नुतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाइन (Online) पध्दतीने **(NSP) पोर्टल** वरुन मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (offline) पदधतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाही. नविन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्यासाठी नविन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी १८७९ संच निर्धारित केलेले आहेत. सदर शिष्यवृत्ती ११ वी, १२ वी, पोष्ट मॅट्रिक डिप्लोमा सर्टिफिकेट पदवी, पदव्युत्तर डीग्री / डीप्लोमा तसेच डिप्लोमा व सर्टिफिकेट या अभ्यासक्रमासाठी देण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी इयत्ता १० वी, व १२ वी ची परिक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातून तसेच पदवी व पदव्युत्तर परिक्षा मान्यताप्राप्त विद्यापीठातून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी अर्ज भरण्यासाठी पात्र आहेत.

तरी विद्यापीठ अधिनस्त असलेल्या जळगांव, धुळे, नंदुरबार जिल्हयातील सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, आपल्या स्तरावरुन विद्यार्थ्यांना सोबत जोडलेल्या परिपत्रकानुसार ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत सूचना देण्यात याव्या.

सोबत-मा.संचालनालयाचे परिपत्रक

सहसंचालक,
उच्च शिक्षण, जळगांव विभाग, जळगांव

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१**

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं-/शिष्य/ दिव्यांगजन/२०२२-२३ /10046 दिनांक- २५.०७.२०२२

27 JUL 2022

**परिपत्रक**

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण.

**विषय: केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार ,नवी दिल्ली यांचे मार्फत राबविण्यात येणा-या दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२२-२३ च्या अंमलबजावणी बाबत.**

**संदर्भ :** भारत सरकार मंत्रिमंडल सचिवालय, प्रत्यक्ष लाभ अंतरण मिशन यांचे पत्र क्र. D- १२०११/०३/२०२२ - DBT, दिनांक १५.०७.२०२२.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, केंद्रशासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मार्फत दिव्यांगजन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे या उद्देशाने **दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना** राबविण्यात येते. सन २०२२-२३ मध्ये सदर शिष्यवृत्ती योजनेकरीता नविन मंजूरीचे (Fresh)आणि नूतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने एनएसपी पोर्टल वरुन मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पद्धतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते

सदर शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्यासाठी नवीन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी **१८७९** संच निर्धारित केलेले आहेत. सदर शिष्यवृत्ती ११वी, १२वी, पोस्ट मॅट्रिक डिप्लोमा / सर्टिफिकेट पदवी , पदव्युत्तर डीग्री /डिप्लोमा तसेच डिप्लोमा व सर्टिफिकेट या अभ्यासक्रमासाठी देण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी इयत्ता १०वी, व १२वी ची परीक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातून तसेच पदवी व पदव्युत्तर परीक्षा मान्यताप्राप्त विद्यापीठातून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी अर्ज भरण्यासाठी पात्र आहेत.

❖ **किमान पात्रता व अटी :**

१. अपंगत्व टक्केवारी ४० टक्के किंवा त्यापुढील असावी.

२. मागील वार्षिक परिक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.

३. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड लाभार्थी नसावा.

४. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रू. २.५० लाख पर्यंत असावे.

Scanned with CamScanner

## ❖ नविन मंजूरी आणि नूतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती :-

१. दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नूतनीकरणासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. **३१.१०.२०२२** ही आहे. व महाविद्यालयांनी अर्जाची पडताळणी करण्याचा अंतिम **दिनांक १५.११.२०२२** ही आहे.

३. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांनी आधार क्रमांक या पर्यायाचा वापर करुन अर्ज भरावा. आधार क्रमांक नसेल तर त्याऐवजी आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत अपलोड करुन अर्ज भरावा.

४. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती चे लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बँकखात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल.

५. विद्यार्थ्याचा बँक खाते चालू स्थितीत असणे (Operative / Active Mode) आवश्यक आहे. जेणेकरून शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण अयशस्वी (Fail) होणार नाही.

६. विद्यार्थ्यांचे बँक खाते स्वत:च्या नावावर असणे आवश्यक आहे. जॉईंट खाते नसावे.

७. खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची राहील

८. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील SOP (standard operating procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

९. ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन, ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह आपल्या महाविदयालयाकडे पुढील कार्यवाहीकरिता सादर करावी.

१०. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या / संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा.

## ❖ विद्यापीठ / महाविद्यालय / संस्थेसाठी सूचना :-

विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीचा (Fresh) किंवा नूतनीकरणाचा (Renewal) चा ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन अर्जाची छाननी करुन ऑनलाईन मंजुरी देण्याची कार्यपध्दती पार पाडावी तसेच मंजूर केलेले अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे जतन करुन ठेवण्यात यावीत तपासणी अंती समितीस उपलब्ध करुण देण्यात यावी तसेच महाविद्यालयांनी विभागाने दिलेल्या युजर आय.डी. व पासवर्ड वापरुन

Scanned with CamScanner

विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीतच पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अन्यथा सदर अर्ज अपात्र समजण्यात येतील.

दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२२-२३ साठी प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित कुलसचिव /प्राचार्य / संस्थाप्रमुख यांची असेल. अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना व SOP (standard operating procedure) www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहे.

उपरोक्त सूचना आपल्या विभागामधील सर्व कनिष्ठ महाविद्यालये, डिप्लोमा महाविद्यालये व उच्च शिक्षण विभागातंर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांना/विद्यापीठास यांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोळी संचालनालयास सादर करावा.

( डॉ.धनराज माने )
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

प्रत-

१.मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२.मा.आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, ३ चर्चपथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१

प्रत,

१. मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,०३ महापालिका मार्ग ,मुंबई
२. मा.संचालक,वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार,मुंबई
३. मा.संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, ०३ महापालिका मार्ग ,मुंबई.
४. मा.संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,भांबुर्डा,पुणे.
५. कुलसचिव,महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,म्हसरुळ,वणी, दिंडोरी रोड नाशिक-४२२ ००४.
६. कुलसचिव,महाराष्ट्र पशुविज्ञान विद्यापीठ,फुटाला लेक,नागपूर ४४० ००१
७ .मा.संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-०१-.
- यांनी त्यांच्या अधिनस्त असणा-या कनिष्ठ महाविद्यालयांना (इयत्ता ११ वी व १२ वी ) सूचना देण्यात याव्यात.
८. कुलसचिव,सर्व कृषि /अकृषि /अभिमत विद्यापीठे,महाराष्ट्र राज्य.

२/- सदर शिष्यवृत्तीसाठी आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थीही पात्र असल्याने सदरचे परिपत्रक आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच याबाबत संबंधितांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

Scanned with CamScanner

संलग्नता विभाग

जा.क्र.कबचौउमवि/ 05/शिष्यवृत्ती / 288 /2020 दि.27/10/2020

प्रति,
मा.प्राचार्य,कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये /परिसंस्था
मा.संचालक / विभाग प्रमुख, सर्व शै.प्रशाळा / विभाग,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

विषय : सन 2020-21 साठी केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर (Post matric) शिष्यवृत्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यवाही बाबत. . .
संदर्भ : मा.संचालक, तथा नोडल ऑफीसर उच्च शिक्षण म.रा.पुणे यांचे पत्र क्र. उशिसं-2020-21/केंद्र पुरस्कृत अल्प./शिष्यवृत्ती/6577 दि.08/10/2020

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयांकीत पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सन 2020-21 मध्ये आपल्या महाविद्यालयातील / परिसंस्थेतील / विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागातील प्रवेशित मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील पात्र विद्यार्थ्यांना **केंद्र शासन पुरस्कृत मॅट्रीकोत्तर (Post matric) शिष्यवृत्ती योजना सन 2020-21** या योजनेचा लाभ घेता यावा यासाठी नवीन शिष्यवृत्ती व शिष्यवृत्तीचे नुतनीकरण करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्याचे शिष्यवृत्तींचे अर्ज नॅशनल स्कॉलरशीप पोर्टलवर (www.scholarships.gov.in) या संकेत स्थळावर ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज भरण्यात येत असून त्यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव संलग्नीत सर्व महाविद्यालये / परिसंस्था यांनी नॅशनल स्कॉलरशीप पोर्टलवर इंस्टिट्युट प्रोफाईल अचूक भरुन अद्ययावत करणे आवश्यक आहे.

सोबत मा.संचालक तथा नोडल ऑफीसर, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे. यांचे संदर्भिय पत्र सोबत जोडत आहोत. शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांनी खालील संकेतस्थळावर दिलेल्या सुचनेचे पालन करुन User ID तयार करुन online नवीन शिष्यवृत्ती अर्ज व शिष्यवृत्ती नुतनीकरण अर्ज भरावा.

www.scholarships.gov.in

वरील बाबत सर्व संलग्नीत महाविद्यालये / परिसंस्था / विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा / विभागांनी प्रवेशित अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना विहीत मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरतांना त्यात दर्शविण्यात आलेली सर्व आवश्यक कागदपत्र Scan करुन ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या जागी अपलोड करणे आवश्यक आहे.

सदर योजनेसाठी जे पात्र अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी शासनाने विहीत केलेल्या मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणार नाहीत. त्यांना **केंद्र शासन पुरस्कृत मॅट्रीकोत्तर (Post matric) शिष्यवृत्ती योजना सन 2020-21 चा लाभ घेता येणार नाही** याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे ही विनंती.

आपला विश्वासू,

(प्रा.डॉ.मा.व्यं.पवार)
प्र.कुलसचिव

सोबत:- संदर्भिय पत्र

प्रत माहितीसाठी
1. मा.संचालक तथा नोडल अधिकारी, उच्च शिक्षण, मध्यवर्ती इमारत, म.रा.पुणे -1,
2. मा.सहसंचालक, उ.शि. जळगाव विभाग जळगाव 3. मा.कुलगुरू कार्यालय, .कबचौउमवि , जळगाव
4. मा.प्र-कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि , जळगाव 5. मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि , जळगाव
6. मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि , जळगाव

उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत, दुरध्वनी क्र : ०२५७ - २२५८४२८, २२५८४२९ फॅक्स क्र.: ०२५७ - २२५८४०३,४०६
Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257 - 2258428, 2258429
Fax No. 0257 - 2258403, 406 Email : registrar@nmu.ac.in Web : www.nmu.ac.in

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१**
**web: www.dhepune.gov.in** **E-mail: schol.dhepune@gov.in**
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र.उशिसं-२०२०-२१/केंद्र पुरस्कृत अल्प./ शिष्यवृत्ती / 16577 दिनांक- ०८.१०.२०२०.

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय : सन २०२०-२१ साठी केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी कार्यवाहीवावत.**

**संदर्भ :१. या कार्यालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/पीएमएस/२०२०-२१ दि.२७/०८/२०२०**

**२.पत्र क्रं उशिसं-२०२०-२१/केंद्र पुरस्कृत अल्प/ शिष्यवृत्ती दि.१५/०९/२०२०**

केंद्र शासनाच्या अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय नवी दिल्ली यांचे कडील प्राप्त सुचनांनुसार सन २०२०-२१ साठी अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेच्या प्रभावी अमंलबजावणीबाबत उपरोक्त संदर्भीय पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे.

नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर सदर शिष्यवृत्ती योजनेसाठी अद्यापर्यंत प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जांची संख्या अत्यंत कमी असल्याने महाविद्यालये / संस्थांनी त्यांच्या महाविद्यालयात शिकणाऱ्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती योजनेची माहिती देण्याबाबत आपल्या स्तरावरून त्वरीत सुचना देण्यात याव्यात. ज्यामुळे संबंधीत पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचीत राहणार नाही.

तसेच सर्व महाविद्यालये / संस्थांनी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर इंस्टिटुट प्रोफाईल अचुक भरुन अद्ययावत करणे आवश्यक आहे.प्रोफाईल अद्ययावत न केल्यास महाविद्यलये विद्यार्थ्यांच्या अर्जांवर पुढील कार्यवाही करु शकणार नाही. त्यामुळे अर्ज संस्थेच्या लॉगीनमध्ये प्रलंबीत राहील्यास होणाऱ्या परीणामांची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालये / संस्था प्रमुखांची राहील.

**(डॉ. धनराज माने)**
शिक्षण संचालक तथा नोडल ऑफिसर
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे -१

**प्रत- माहिती व कार्यवाहीस्तव,**

**आपल्या अधिनस्त असलेल्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना याबाबत कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना देण्यासाठी आवश्यक त्या कार्यवाहीस्तव**

१. मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, ०३ महापालिका मार्ग ,मुंबई
२. मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, मुंबई
३. मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, ०३ महापालिका मार्ग, मुंबई.
४. मा.संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,भांबुर्डा, पुणे.

Scanned by CamScanner

५. मा.संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१

६. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, म्हसरुळ, वणी , दिंडोरी रोड नाशिक-४२२ ००४.

७. कुलसचिव, महाराष्ट्र पशुविज्ञान विद्यापीठ,फुटाला लेक, नागपूर ४४० ००१

८ .मा.संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-०१-.

- यांनी त्यांच्या अधिनस्त असणा-या कनिष्ठ महाविद्यालयांना (इयत्ता ११ वी व १२ वी ) सूचना देण्यात याव्यात.

९. कुलसचिव, सर्व कृषि /अकृषि /अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

प्रत - माहितीस्तव सविनय सादर.

१)मा.अपर मुख्य सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई.

२)मा.अपर मुख्य सचिव,अल्पसंख्यांक विकास विभाग,मंत्रालय मुंबई.

Scanned by CamScanner

महाराष्ट्र शासन

उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१.

जाहिरात

**केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर ( Post Matric ) शिष्यवृत्ती योजना सन २०२० - २१**

राज्यातील मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील गुणवान विद्यार्थ्यांसाठी केंद्रशासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये सन २०२०-२१ साठी ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. यासाठी विद्यार्थ्यांचे नविन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Renewal) करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांनी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे. फक्त ऑनलाईन (Online) पध्दतीने भरलेले अर्ज स्विकारले जातील. **कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन (Offline) अर्ज स्विकारले जाणार नाहीत**. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी केंद्र शासनाने नवीन शिष्यवृत्ती (Fresh) करिता **४७५७५** संच (Quota) निर्धारित केलेले असून त्यातील ३० टक्के संच मुलींसाठी राखीव आहेत. नूतनीकरणासाठी संच निर्धारीत नसतात. सदर शिष्यवृत्तीचा निधी १०० टक्के केंद्र शासनाकडून वितरीत करण्यात येतो. विद्यार्थ्यांस मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम (Course / Tution fee and maintenance allowance) केंद्र शासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT mode) जमा करण्यात येईल.

❖ **शिष्यवृत्तीसाठी पात्र अभ्यासक्रम :**

११ वी ते पीएच्.डी ,व्यावसायिक, (डी.एड्., बी.एड्., एम.एड्., आय.टी.आय.) सर्व डिप्लोमा व अकरावी / बारावी स्तरांवरील एम.सी.व्ही.सी. अभ्यासक्रम (तंत्र शिक्षण विभागातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यादीतील अभ्यासक्रम सोडून इतर सर्व).

❖ **किमान पात्रता व अटी :**

१.) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

२.) विद्यार्थी मागील वार्षिक परीक्षेत किमान ५० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.

३.) अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २.०० लाख पर्यंत असावे.

४.) अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.

५.) नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यास मागील वार्षिक परीक्षेत ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे तसेच विद्यार्थी त्याच महाविद्यालयात व त्याच अभ्यासक्रमात शिकत असणे आवश्यक आहे.

६.) एका कुटुंबातील फक्त दोन अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.

७.) एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल / वसूल केली जाईल.

८.) विद्यार्थ्याने घेतलेला अभ्यासक्रम कमीत कमी १ वर्ष कालावधीचा असणे आवश्यक आहे.

❖ **अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे :**

१) विद्यार्थ्याचा फोटो

२) मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत.(Self Attested)

३) महाविद्यालयाने संबंधित विद्यार्थी त्या महाविद्यालयात असल्याबाबतचे तसेच Day scholars / hosteller याबाबतची पडताळणी केल्याबाबतचे प्रपत्र (Institution Verification Form FAQs) सोबत देण्यात आलेला आहे.

४) पालकाचे राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.

५) अल्पसंख्यांक समुदायाबाबतचे स्वतः प्रमाणित केलेले स्वयंघोषित प्रमाणपत्र,१८ वर्षाखालील विद्यार्थ्यासाठी त्यांच्या पालकांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र.

६) महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती / रिसीप्ट.

७) बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत.

८) रहिवासी प्रमाणपत्र. (Residential/Domicile Certificate)

९) आधार कार्ड छायांकित प्रत. तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्यांचे आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हींग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्याच्या ओळखीबाबतचे फोटोसह असलेले प्रमाणपत्र ईत्यादी यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या ऑनलाईन भरलेल्या अर्जाच्या हार्ड कॉपी सोबत सदर कागदपत्रे महाविद्यालयात अर्ज तपासणीसाठी त्वरीत सादर करावी. महाविद्यालयांनी सदर कागदपत्रे काटेकोरपणे तपासुन ऑनलाईन अर्जावर पुढील कार्यवाही करावी व सदर कागदपत्र त्यांच्या स्तरावर जतन करुन ठेवावी.

रु. ५०,०००/- पेक्षा जास्त शिष्यवृत्ती रक्कम असलेल्या विद्यार्थ्यांनी अर्जासोबत सर्व कागदपत्र UPLOAD करणे आवश्यक आहे, तसेच महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती / रिसीप्ट प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह UPLOAD करण्यात यावी.

❖ **अर्ज करण्याची पध्दत (नविन मंजुरी /नुतनीकरण):**

१. अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. National Scholarhips (NSP) या मोबाईल ॲप ची सुविधा देखील अर्ज भरण्यासाठी देण्यात आलेली आहे.

३. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या homepage वरील Guiedlines व Frequently Asked Questions (FAQ) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

४. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधुन सदर अर्ज महाविद्यालयाच्या / संस्थेच्या मदतीने पूर्ण करून घ्यावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येणे अनिवार्य आहे.

५. विद्यार्थ्याने ज्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे त्या अभ्यासक्रमाच्या प्रथमवर्षी शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर अभ्यासक्रम पूर्ण होई पर्यंत विद्यार्थ्यांने **नूतनीकरणासाठीच** अर्ज भरावा.

❖ **महाविद्यालय / संस्थांसाठी सूचना :**

१. विद्यार्थ्यांने महाविद्यालयात चालू वर्षात प्रवेश घेतलेला असणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्याने वसतीगृहात रहात असल्याचे अर्जात नमूद केलेले असल्यास त्याबाबतची खात्री संबंधित महाविद्यालयांनी विद्यार्थ्याच्या कायमस्वरूपी पत्त्यावरून करावी.

३. महाविद्यालयांनी संकेतस्थळाच्या Homepage वरील Guidelines व Frequently Asked Question (FAQs) बाबत व्यवस्थित माहिती करुन घेऊन त्यानुसार विद्याथ्र्यांना सूचना देण्यात याव्यात.

४. विद्यार्थ्यांस प्रथम वर्षी शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर तो अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांने नुतनिकरणाचा अर्ज भरल्याची खात्री करण्यात यावी.

५. सर्व महाविद्यालय/संस्था यांनी त्यांचे लॉगीनमधून ऑनलाईन पध्दतीने अद्ययावत अभ्यासक्रमनिहाय फी नमुद करुन Profile update करावे.

६. महाविद्यालय/संस्थानी प्रत्येक विद्यार्थ्याचा ऑनलाईन अर्ज तपासणी करतांना विद्यार्थ्याचे Fee Details तपासून बरोबर नसल्यास त्यात दुरुस्ती (Edit) करावे.

७. ज्या महाविद्यालय/संस्थानी त्यांचे KYC पूर्ण केले नाहीत त्यांनी KYC ऑनलाईन पध्दतीने NSP पोर्टल लॉगीनमधून पूर्ण करुन घ्यावे. तसेच ज्या महाविद्यालय/संस्थानी Online Institute Registration Form भरलेला आहे परंतु संचालनालयाकडून Approve करुन घेतलेला नाही त्यांनी Institute Registration Form Approve करुन घेणे आवश्यक आहे.

❖ **विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरतांना बँक तपशील भरण्याबाबत सूचना :**

१. विद्यार्थ्याने (Drop Down List) मधून त्यांच्या बॅक / शाखेचे नाव काळजीपूर्वक निवडावे.
२. त्यानंतर विद्यार्थ्याने त्यांचा बँक खाते क्रमांक व आय.एफ.एस.सी. कोड अचूक भरावा. विद्यार्थ्यांनी त्यांच्या बँक खाते क्रमांक व आय.एफ.एस.सी. कोड बाबत त्यांच्या बॅंकेकडून खात्री करून घ्यावी.
३. विद्यार्थ्याचा बँक खाते क्रमांक चालू स्थितीत असणे (Operative / Active Mode) आवश्यक आहे. जेणेकरून शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण अयशस्वी (Fail) होणार नाही.
४. विद्यार्थ्यांचा खाते क्रमांक (Core bank facility) असलेल्या (Scheduled) बँकेचाच असणे आवश्यक आहे.
५. बँक खाते विद्यार्थ्याच्या स्वतःच्या नावावर असणे आवश्यक आहे.
६. केंद्रशासनाच्या सूचनांनुसार ज्या विद्यार्थ्याचे बँक तपशिल चुकीचे असतील अथवा त्यांच्या बँकेने त्यांचे बँक खाते प्रमाणित केले नाही (Incorrect / Not validate) तर त्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मंजूर झालेली असेल तरी विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती रक्कम जमा होणार नाही /रद्द होईल.

**अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती सन २०२०-२१ करिता नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नूतनीकरण (Renewal) अर्ज सादर करण्यासाठी भारत सरकारने घोषित केलेले वेळापत्रक**

| अ.क्र. | कार्यसूची | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| | | नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व नूतनीकरण शिष्यवृत्ती (Renewal) |
| १ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | ३१ ऑक्टोंबर, २०२० |

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज फॉरवर्ड करण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जासोबत दिलेल्या कागदपत्रांची तपासणी करून त्या अर्जावर विनाविलंब योग्य ती कार्यवाही करून पात्र अर्ज पुढील टप्प्यावर तात्काळ फॉरवर्ड करावेत.

विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी अधिक माहितीसाठी तसेच याबाबतच्या वेळोवेळी नविन प्राप्त होणाऱ्या सूचनांसाठी www.scholarships.gov.in व www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे अवलोकन करावे. सदरचे संकेतस्थळ हे www.minorityaffairs.gov.in व www.dhepune.gov.in या संकेतस्थळाशी देखील जोडलेले (Link) आहे. तसेच संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाशी किंवा उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ येथे दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२६९३९ / २९७०७०९८ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत अधिक माहितीसाठी संपर्क साधावा. अथवा schol.dhepune@gov.in या ईमेल वर मेल करावा.

**(डॉ. धनराज माने)**
संचालक तथा नोडल ऑफिसर
उच्च शिक्षण , महाराष्ट्र राज्य, पुणे १